लोकमत

# वि. स. खांडेकर यांना अभिवादन

कोल्हापूर : मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे वि. स. खांडेकर यांचा ४५ वा स्मृतिदिन गुरूवारी शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र - कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढारी



कोल्हापूर : वि. स. खांडेकर यांच्या ४५ व्या स्मृतिदिनानिमित्त विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे त्यांच्या पुतळ्यास अभिवादन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर व इतर. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठात वि. स. खांडेकर स्मृतिदिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले परितोषिक मिळवून देणारे वि. स. खांडेकर यांच्या ४५ व्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे आदरांजली वाहण्यात आली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते वि.स.खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. निलांबरी जगताप, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात वि. स. खांडेकर यांचा स्मृतिदिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे वि. स. खांडेकर यांचा ४५ वा स्मृतिदिन गुरुवारी शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे भावपूर्ण वातावरणात झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : डॉ. निशा पवार लिखित 'मीडिया रिसर्च इन कंटेम्परररी सोसायटी' संशोधन ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पवार, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. के. कामत आदी.

# 'मीडिया रिसर्च इन कंटेम्पररी सोसायटी' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. २ :** शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार लिखित 'मीडिया रिसर्च इन कंटेम्परररी सोसायटी' संशोधन ग्रंथाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आज प्रकाशन झाले. पवार यांचा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार झाला.

पवार यांच्या निवडक माध्यमविषयक संशोधन लेखांचा संग्रह ग्रंथात आहे. यात समकालीन माध्यम संशोधनाचा समावेश आहे. विशेष म्हणजे कर्नाटक विद्यापीठातर्फे ग्रंथ प्रकाशित केला आहे. माध्यमातील विविध विषयांचा ऊहापोह लेखांत असून त्याचा लाभ माध्यमातील संशोधक विद्यार्थी आणि शिक्षक यांना होईल, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. त्यांनी आतापर्यंत दहापेक्षा अधिक ग्रंथांचे लेखन केले असून, यात पब्लिक रिलेशन, थिअरॉटिकल डायमेन्शन ऑफ वुमन इन इंडियन प्रिंट मीडिया, वृत्तपत्रीय लेखनाची दोन दशके, संवादशास्त्र, वूमन इन रिजनल टेलीविजन चॅनल्स इत्यादी मराठी आणि इंग्रजी ग्रंथांचा समावेश आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.